**नि.दि.दा.क्र. ७१/२०२४ मधील नि.क्र. २० वरील आदेश**
**(पारीत दि. ०७.०३.२०२६ रोजी)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी विना लेखी कैफियत झालेला हुकुम रद्द करून लेखी कैफियत स्विकारण्याची परवानगी मिळण्याबाबत सादर केलेला आहे.

२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, सदरकामी या प्रतिवादी यांनी या कामी सिपीसी कलम १० प्रमाणेचा अर्ज दिला असलेने याकामी कैफियत व म्हणणे दिलेले नव्हते. मात्र तांत्रीक अडचण राहू नये म्हणून सदर प्रतिवादी हे अर्जास कैफियत व म्हणणे देत आहेत. तसेच युक्तीवाद करणेस पुढील मुदत मिळावी अशी विनंती केली आहे. तरी ठेवणेत आलेला नो डब्ल्यू एस चा आदेश न करता सदरची कैफियत व म्हणणे दाखल करुन घेण्याची व अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जाखाली वादी यांनी त्यांचे म्हणणे नि. २३ वर दाखल करुन अर्जतील कथने नाकारली आहेत. वादी यांचे म्हणणे की, अर्जात दिलेले कारणे व अर्ज वादीस मान्य व कबूल नाही. मा. कोर्टाचे कोणतेही रेकॉर्ड न पाहता दिलेला अर्ज प्रथमदर्शनीच फेटाळण्यास पात्र आहे. प्रतिवादींना वारंवार संधी देवून देखील कायदेशीर मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल केले नसल्याने नो. डब्ल्यू एस व नो से आदेश केलेला आहे व तो

आदेश योग्य व बरोबर आहे. प्रतिवादींनी कोणतेही सबळ व विश्वसणीय कारण अथवा पुरावा दिलेला नाही. तसेच सदर अर्जातील मागणी पाहता प्रतिवादींना नक्की कैफियत दाखल करुन घेणेत यावी अथवा युक्तीवादाकरीता पुढील तारीख मिळावी यापैकी कोणती मागणी मागावयाची आहे याबाबत देखील सदर अर्जात स्पष्टता नाही. याशिवाय प्रस्तूत अर्जासोबत शपथपत्र दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरचा प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी व त्यांचे विधिज्ञ मागील बऱ्यांच तारखांपासून गैरहजर असून सदर अर्जावर युक्तीवाद केलेला नाही. याशिवाय प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जासोबत शपथपत्र दाखल केलेले नाही. परंतू अर्जासोबत प्रतिवादी लेखी कैफियत दाखल केलेली आहे. लेखी कैफियत अभिलेखावर घेतल्यास सदर दाव्याचा गुणानुगुणावर निपटारा होण्यास सदर लेखी कैफियत अभिलेखावर घेतल्याने मदतच होणार आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. पण लेखी कैफियत अभिलेखावर न घेतल्यास प्रतिवादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे न्यायदानाच्या दृष्टीने तांत्रीक बाबी बाजूला ठेवून कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायोचित होईल. प्रतिवादी यांनी वादीस झालेल्या त्रासाची भरपाई काही रक्कम वादीना देवुन करता येईल. प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घेवून पूढील तारखेपर्यंत

आवश्यक ती पूर्तता करावी. सबब, वरील कारणाचा विचार करुन खालील आदेश पारीत करण्यात येतात.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. २० मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ व २ विरूध्दचा विना लेखी कैफियत आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादींनी, झालेल्या विलंबापोटी, वादीस रक्कम रु. ५००/– (रु. पाचशे फक्त ) पुढील तारखेपर्यंत दयावेत.

४. प्रतिवादींनी उपरोक्त आदेशाची पूढील तारखेपर्यंत पुर्तता न केल्यास सदरचा आदेश आपोआप रद्द होईल व प्रकरण विना जबाब दावा चालवण्यात येईल.

MAHESH ARVINDRAO KULKARNI
Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.03.07 16:50:21 +0530

**(एम. ए.कुलकर्णी)**

दि. ०७.०३.२०२६

सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर),
कवठेमहांकाळ.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 07.03.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 07.03.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 07.03.2026 |